ISSN 2249-894X Impact Factor : 3.1402 (UIF) Volume - 5 | Issue - 8 | May - 2016

Review Of Research






# मुसलमान आणि भारतीय राजकारण

प्रा.संजय त्र्यं.साळवे
सहाय्यक प्राध्यापक , सिध्दार्थ महाविद्यालय जाफ्राबाद , ता.जाफ्राबाद जि.जालना.

## प्रास्ताविक :

भारतीय राजकारणामध्ये मुस्लीम समाजाला स्वातंत्र्यपूर्वी निवडणूकीच्या राजकारणात चांगले यश मिळाल्याचे दिसते. १९३७ च्या निवडणूकीमध्ये मुस्लीम लिगला थोडा प्रतिसाद मिळाल्याचे दिसते. परंतु १९४६ च्या निवडणूकीमध्ये मुस्लीम लिग हा मुसलमानांचा प्रतिनिधीत्व करणारा पक्ष म्हणून मान्यता पावल्याचे दिसते. या निवडणूकीत मुसलमान ज्या-ज्या विभागात संख्येने कमी होते तेथे मुस्लीम लिगला त्यांचे भरपूर समर्थन मिळालेले होते. यावेळी सर्वांना मतदानाचा अधिकार नव्हता तो संपत्तीच्या प्रमाणानुसार मतदानाचा अधिकार होता.

भारताच्या फाळणीनंतर त्या काळाच्या बहुतांश मुसलमान नेत्यांनी पाकिस्तानमध्ये जाण्याचा निर्णय घेतला. त्याकाळी मुस्लीम नेत्यामध्ये प्रामुख्याने स्वातंत्र्यापूर्वीचे नवाब, जहागीरदार, ब्रीटीश सरकारचे मुस्लीम आधिकारी, सुशिक्षित मुस्लीम लोक इ. सामील होते. हे सर्व पाकिस्तान मध्ये राजकारण, समाजकारण, धर्मकारण आणि प्रशासन इ. मध्ये संधी किंवा वाटा मिळविण्याच्या इच्छेने पाहिस्तानमध्ये सामील झालेले होते.

या दरम्यान भारतामध्ये हिंदूत्ववादी विचार सरणीला माननारे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, हिंदू, महासभा, काँग्रेसमधील काही धर्मवेडे लोक हिंदूत्ववादी विचार घेऊन पुढे येत होते व हे सर्व हिंदुत्ववाद भारतात रुजविण्याचा प्रयत्न करीत होते. परंतु या सर्व प्रक्रियेमध्ये भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनातील अनेक महत्वाचे पुढारी अंतर राखुन होते.

## संशोधनाचा उद्देश -

१. स्वातंत्र्य भारताच्या राजकारणात मुस्लीम अल्पसंख्याकांच्या राजकारणाची दिशा जाणुन घेणे.
२. भारतामध्ये स्वातंत्र्यानंतर अल्पसंख्य समुह म्हणून सरकारच्या माध्यमातून मुसलमानांसाठी शिक्षण, सुरक्षा आणि रोजगार इ. किती प्रमाणात संधी निर्माण झाल्याची माहिती जाणुन घेणे.
३. बाबरी मस्जीद पतनानंतर भारतातील मुस्लीम राजकारणाची दिशा जाणुन घेणे.

स्वतंत्र्य भारताच्या राजकारणामध्ये काँग्रेस हा एकमेव पक्ष उदयास आल्याचे दिसते. सुरुवातीला काँग्रेसने मुस्लीम लिगच्या भारतामध्ये राहिलेल्या नेत्यांचे सहकार्य घेतले व त्यांना भारतामध्ये ज्या प्रखर हिंदूत्ववादी पक्ष, संघटना म्हणून

उदयास येत होत्या त्या भारतीय जनसंघ, हिंदू महासभा आणि रामराज्य परिषद इ. शक्तीची जाणिव करुन देऊन मुसलमानांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण केली आणि मुसलमानाच्या आर्थिक, राजकीय, शैक्षणिक प्रश्नांकडे दूर्लक्ष केले.

१९५७ सार्वजनिक निवडणुकीमध्ये मुस्लीम नेत्यांकडून असा विचार केला गेला की, मुसलमानांच्या आर्थिक, सामाजिक प्रश्नांसाठी विकासाची दिशा घेऊन चालणाऱ्या पक्षासोबत जावे. त्यातूनच आसाम, पश्चिम बंगाल, बिहार, उत्तर प्रदेश कर्नाटक आणि महाराष्ट्र इ. राज्यात मोठ्या प्रमाणात मुसलमान नेते विरोधी पक्षा सोबत गेले आणि देशामध्ये विरोधी पक्षाचा आवाज वाढत असतांनाच केरळमधे् कम्युनिस्ट पक्षाच्या सरकार विरोधात काँग्रेस, मुस्लीम लिग आणि प्रजा सोशिलीस्ट पार्टीची युती  झाली आण मुसलमानांच्या काँग्रेस विरोधी राजकारणाची दिशा बदलली.

देशामध्ये १९६१ आणि १९६४ मध्ये मोठ्या प्रमाणात जातीय दंगे झाली आणि यातुन पुन्हा काँग्रेसने मुसलमांनाना हिंदुत्ववदी संघटनाची भिती घालुन निवडणुकीत मुस्लीम मतांचा फायदा करुन घेतला. १९६१ च्या हिंदु-मुस्लीम दंग्याचा परिणाम म्हणून मजलिस मुशावरात सारख्या नवीन मुस्लीम संघटना निर्माण होऊन त्यांनी मुसलमानांच्या सामाजिक, आर्थिक, राजकिय, शैक्षणिक, ऊर्दू भाषेच्या प्रश्नांकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला.

१९६७ च्या निवडणुकीमध्ये भारतात काँग्रेस विरोधी वातावरण होते. त्यावेळी मुस्लीम समाज मोठ्या प्रमाणात काँग्रेस विरोध करीत होता. कारण वर्षभरापूर्वी पाकिस्तानने कश्मीरवर केलेल्या आक्रमणाला तत्कालीन भारताचे पंतप्रधान श्री. लालबहादूर शास्त्री यांनी चोख उत्तर देऊन पाकिस्तानला नमविले होते. त्याचा राग भारतीय मुसलमान नेते व समाजाध्ये होता. त्याचा परिणाम म्हणून १९६७ मध्ये प्रथमच भारताच्या बऱ्याच घटकराज्यामध्ये काँग्रेस विरोधी सरकारे आली. १९६९ मध्ये भारतात पुन्हा मोठ्या प्रमाणात धार्मीक, दंगली झाल्या. या दंगली राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व इतर हिंदुत्ववादी संघटनांनी घडवुन आणल्याचे मत मुस्लीम संघटनांचे होते. यातूनच हिंदुत्ववादी संघटनाच्या विरोधात श्रीमती इंदिरा गांधी यांच्या काँग्रेस, भारतीय कम्यूनिस्ट पार्टी, भारतीय क्रांतीदल आणि मुस्लीम, दलीत संघटनांनी मिळुन महाआघाडी केली. यातून काँग्रेस निवडणुकीत मोठे यश प्राप्त झाले. यात दलीत आणि मुसलमानांचे मते महत्वाचे होते.

यातूनच १९७७ पुर्वी ही महाआघाडी फुटली आणि पुन्हा इंदिरा गांधी कडुन मुसलमानांचा अपेक्षा भंग झाला. यासाठी महत्वाचे कारण होते. देशामध्ये वाढलेली महागाई, आणि वाढत्या लोकसंख्येला आळा घालण्यासाठी सरकारचे असलेले कुटूंब नियोजनाचे धोरण. उदा. पुरुषांची नसबंधी इ. यातूनच जनता पार्टीचे सरकार आले. जनता पार्टीच्या सत्तेच्या काळात भारतात जातीय दंगे झाले आणि यातुनच मुस्लीम समाजात पुनहा असुरक्षीततेची भावना मोठ्या प्रमाणात निर्माण झाली. यातूनच १९८० च्या निवडणूकीत मुस्लीम समाजाने आपली मते काँग्रेस आणि जनता दल (एस) ला दिल्याचे दिसते. १९८० च्या निवडणुकीत इंदिरा गांधीला सत्ता मिळाली आणि इंदिरा गांधीने मुस्लीम समाजाला जवळ करुन काँग्रेसची वोट बँक निर्माण केली आणि यातूनच काँग्रेस आणि मुस्लीम समाज पुन्हा परस्परांजवळ आले.

परंतु इंदिरा गांधीनी १९८२-८३ ला पुन्हा आपली राजकारणाची दिशा हिंदू मतावर आधारीत आखली आणि यामेळेच त्यांना १९८३ मध्ये कर्नाटक, आंध्र प्रदेश, आणि त्रिपुराच्या विधानसभा निवडणूकीत काँग्रेसला पराभव पत्कारावा लागला. मात्र त्यानंतर इंदिरा गांधी १९८३ मध्ये जम्मु कश्मीर निवडणुकीमध्ये हिंदूचे मत मिळविण्यासाठी जम्मु कश्मीरमध्ये फारुक अब्दुल्लाचे सरकार बरखास्त करुन हिंदूमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण केली. यातूनच पुढे शिख समुदायातील असुरक्षिततेमध्ये त्यांची हत्या झाली.

बाबरी मस्जीद आणि राम मंदिर वादातून भारतातध्ये १९८६ ते ८९ या काळात जातीय दंगली झाल्या व यातूनच मुसलमानामये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली. यातच पोलीस आणि प्रशासनाकडून मुसलमानांवर अल्याचार देखील झ ााले. असुरक्षीततेच्या भावनेतुन मुसलमान नेत्यांनी ऊर्दू भाषा, अलिगड मुस्लीम विद्यापीठाचा प्रश्न, शरीयत मधील हस्तक्षेपाचा विषय आणि त्या बरोबरच बाबरी मस्जीदीचा प्रश्न इ. विषय घेऊन मुस्लीम नेतृत्व पुढे आले.

राम मंदिर प्रश्नावरुन भारतीय जनता पार्टीने रथ यात्रा काढुन राममंदिराच्या उभारणीसाठी देशभरातून विटा जमा केल्या. तेंव्हा देशामध्ये काँग्रेस सरकार होते. त्यामुळे मुसलमानांमध्ये काँग्रेस विरोधी वातावरण तयार झाले. त्याचा परिणाम एवढा तिव्र होता की, जेंव्हा जनता दल आणि भाजपा युती झाली तेंव्हा मुसलमान जनता दल सोबत होते. यादरम्यान भारतातील संपूर्ण राजकारण हे धार्मीक विचारावर आधारलेले आहे असे एक चित्र निर्माण झाले होते.याचवेळी जनता दलाच्या व्हि.पी.सिंग सरकारने मंडल आयोगाच्या शिफारशीची अंमलबजावणी करण्याचे ठरविले. यामध्ये ५२ टक्के ओबीसींना केंद्र सरकारच्या नोकऱ्यांमध्ये २७ टक्के आरक्षण हेते. मुस्लीम समाजातील १९८० च्या मंडळ आयोगाच्या निष्कर्षानुसार ओबीसीमध्ये मुसलमांनाची संख्या ११.२ टक्के आहे. यातुन मुसलमानामध्ये शैक्षणिक सुधारण्याची भावना निर्माण झाली. मंडळ आयोग आणि राम मंदिर प्रश्नावरुन व्ही.पी.सिंगाचे सरकार पडले आणि बाबरी मस्जीदीचे संरक्षण आणि मंडळ आयोग प्रश्नासाठी मुसलमानांना जनता दल सोबत गेले. यावेळी प्रथमच मुसलमान काँग्रेसपासून दूर गेल्याचे चित्र निर्माण झाले. यातूनच बिहारमध्ये जनता दलाचे सरकार आले.

१९९२ ला बाबरी मस्जीदीच्या पतनानंतर मुसलमान समुदाय असुरक्षीत आणि दु:खी झाला आणि काँग्रेसवर नाराज झ ााला होता. यावेळी जनता दलातही मोठी फुट झाली होती. मुसलमानांच्या रोजगारीचा प्रश्न निर्माण झाला होता. यातूनच

मुसलमान समाजामध्ये आपल्या पारंपारिक नेत्यांविरुध्द असंतोष  खदखदत होता. यातूनच भारतात सुरु झालेल्या जागतिकीकरणामुळे मुस्लीम समाजामध्ये शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक प्रश्नांवर मोठ्या प्रमाणात चर्चा सुरु झाली व त्यातूनच मुस्लीम समाजातील अंतर्गत असलेल्या स्त्रियांचे प्रश्न, घटस्फोट, युवकांचे प्रश्न इ. प्रश्नांवर चर्चा सुरु झाली.

### निष्कर्ष :

१. भारतामध्ये कॉंग्रेसने मुसलमानांमध्ये असुरक्षिततेचे भावना, निर्माण करुन त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक विकासाच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करण्यात आले.
२. भारतीय राजकारणात मुसलमांनाना स्वतंत्र अस्तीत्व निर्माण करता आले नाही.
३. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत मुसलमानांच्या विकासाचे प्रश्न निर्माण होऊन मुस्लीमांमध्ये अंतर्गत कलहास सुरुवात झाल्याचे दिसते.

### संदर्भ :

१. राजनिती की किताब (रजनी कोठारी का कृतीत्व) संपादक - अक्षयकुमार दुबे.
२. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे निवडक लेख - डॉ.गंगाधर पानतावणे.
३. हम हिंदूस्तानी - नानी पालखीवाला.
४. जाती भेद का उच्छेद - डॉ. बाबासाहेब आंबेडकर.
५. आजके प्रश्न भारतीय मुसलमान : मिथक और यथार्थ - संपादक - राजकिशोर.
६. स्पर्धा काळाशी - शरद पवार - संपादन - अरुण टिकेकर, अभय टिळक.